जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४० दिनांक - १४/०७/२०२३**

## खंडणी विरोधी पथक -२,गुन्हे शाखा,पुणे शहर

## खूनाचे प्रयत्नाचा गंभीर गुन्हा केलेल्या रेकॉर्डवरील आरोपीतांना आश्रय देवून पलायन करण्यासाठी व लपून रहाण्यासाठी मदत करणा-या दोन इसमांना खंडणी विरोधी पथकाकडुन जेरबंद

दि.२०/०६/२०२३ रोजी **लष्कर पोलीस स्टेशन,पुणे शहर गुन्हा रजि.नं.१३४/२०२३,भा.दं.वि. कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९,४२७,आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१) १३५** अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार ॲलेक्स गवळी व त्याचे फरार १० ते १५ साथीदार यांनी केला आहे. गुन्हा केल्यापासून ॲलेक्स गवळी व इतर आरोपी हे फरार आहेत. सदर फरार आरोपीतांचा शोध घेणेबाबत मा.वरिष्ठांनी आदेशित केले होते. त्याप्रमाणे नमूद गुन्हयातील फरारी आरोपी ॲलेक्स गवळी व इतर आरोपीतांचा खंडणी विरोधी पथक-२,गुन्हे शाखा,पुणे व लष्कर पोलीस स्टेशन असे संयुक्तरित्या शोध घेत असताना,संशयीत इसम नामे **१)शुभम प्रितम सारवान,वय-२७ वर्ष,रा.रुम नं. १३,पिसिबी क्वॉटर्स,धोबी घाट,शंकरशेठ रोड,कॅम्पपुणे २)अजिम सलीम शेख,वय-२९ वर्ष रा. कॉलनी नं.१०,कासेवाडी पुणे** यांना दाखल गुन्हयाचे अनुषंगाने ताब्यात घेवुन,त्यांच्याकडे चौकशी केली असता,शुभम प्रितम सारवान व अजिम सलीम शेख यांनी ॲलेक्स गवळी व इतर आरोपीतांनी गंभीर अपराध केला आहे हे माहित असताना देखील,दोघांनी फरारी आरोपीतांना आश्रय देवून,पलायन करण्यासाठी व लपुन रहाण्यासाठी मदत केल्याचे निष्पन्न झाल्याने,नमूद गुन्हयात भा.दं.वि.कलम २१२ अन्वये वाढ करुन,त्यांना लष्कर पोलीस स्टेशन यांनी नमूद गुन्हयात अटक केली आहे.

**भविष्यात अशाच प्रकारे सराईत गुन्हेगारांना आश्रय देणारे इसमांवर गुन्हे शाखेमार्फत कडक कारवाई करण्यात येणार आहे.**

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,(गुन्हे), श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शानाखाली खंडणी विरोधी पथक-२, गुन्हे शाखा,पुणे,पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, लष्कर पोलीस स्टेशन,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.शशिकांत चव्हाण, सहा.पो.निरीक्षक,चांगदेव सजगणे, पोलीस उपनिरीक्षक,श्रीकांत चव्हाण, मोहन दास जाधव व पोलीस अंमलदार,विजय गुरव, प्रदिप शितोळे, संग्राम शिनगारे, सुरेंद्र जगदाळे, सैदोबा भोजराव, सचिन अहिवळे, अमोल पिलाने, चेतन आपटे, अनिल मेंगडे, इश्वर आधंळे राहुल उत्तरकर, पवन भोसले,चेतन शिरोळकर, प्रदिप गाडे, किशोर बर्गे व लष्कर पोलीस स्टेशन,पुणे यांनी संयुक्तरित्या केलेली आहे.